# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

---

**दिनांक १०.१०.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :— खुनाचा प्रयत्न, गुन्ह्यातील दोन वर्षापासुन पाहीजे असलेला आरोपी अटकेत.**

दिनांक ०९.१०.२०२६ रोजी गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांचे पथक हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, मागील दोन वर्षापासुन खुनाचे प्रयत्नातील गुन्ह्यामध्ये पाहीजे असलेला आरोपी इसम हा ऑटोमोटीव्ह चौक परीसरात फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत ऑटोमोटीव्ह चौक परीसरात तपासणी केली असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम संशयीतरित्या वावरतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शुभम उर्फ पंडीत शरद गावंडे, वय ३० वर्षे रा. गारगोटी नगर, ह.मु.— हिमांशु अशोक गावंडे चे घरी किरायाने, पागोटे किराणा दुकान जवळ, दिघोरी, हुडकेश्वर, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो पोलीस ठाणे यशोधरानगर येथे दाखल अप. क्र. ६०३/२०२४ कलम ३५२, ३५१(२), १९१(३),१९१(२),१९०, १८९(२), ११५, १०९(१) भा.न्या.स. या गुन्ह्यात पाहीजे आरोपी असल्याचे दिसुन आले. आरोपी हा गुन्हा घडल्यापासुन आपले अस्तीत्व लपुवन, गुन्ह्यात मिळुन येत नव्हता. आरोपीस नमुद गुन्हयात अटक करून पुढील कार्यवाहीस्तव यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**२) सदर पोलीसांची कामगीरी :— म.को.का. अंतर्गत गुन्ह्यातील पाहिजे आरोपीस अटक.**

फिर्यादी नामे लक्की नरेश दासर, वय २४ वर्षे, रा. सुदर्शन दुर्गा माता मंदीर जवळ, गड्डीगोदाम, सदर, नागपुर हे त्यांचे शेजारी राहणारा ०२ वर्षीय वालक यास ॲक्टिवा गाडीवर बसवुन फिरवीत असतांना, फिर्यादीचे

गाडीस आरोपी सलीम खान याचे गाडीचा धक्का लागल्याने, फिर्यादी यांनी आरोपीस ''गाडी बराबर चला'' असे म्हटल्याने, फिर्यादी व आरोपीमध्ये शाब्दीक वाद झाला. त्यानंतर फिर्यादी व त्याचे मित्र आरोपीस समजाविण्याकरीता गेले असता, आरोपी क्र. १) शकील खान वल्द अब्दुल गफार खान, वय ४० वर्षे, २) सुजल जोसेफ पॉल, वय २० वर्षे, ३) साजीद शेख वल्द अब्दुल गफार खान, वय २६ वर्षे, ४) सलीम खान अब्दुल गफार खान, वय ४६ वर्षे, ५) राजा खान वल्द अब्दुल गफार खान, वय ३० वर्षे, सर्व रा. गोवा कॉलोनी, संतोषी माता मंदीर जवळ, सदर, नागपुर यांनी संगणमत करून, गैरकायद्याची मंडळी जमवुन, हातबुक्कीने मारहाण केली. तसेच, फिर्यादीचा मित्र नामे राहुल उर्फ सोनु काशीनाथ डकाहा, वय ३४ वर्षे, रा. सुदर्शन दुर्गामाता मंदीर जवळ, सदर, नागपुर यास जिवे ठार मारण्याचे उद्‌देशाने लाकडी व लोखंडी शस्त्राने मारून गंभीर जखमी केले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे सदर येथे कलम १०९(१), १८९(२), १८९(४), २९६, ११५(२) भा.न्या.सं. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, सदर पोलीसांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशिर माहीतीवरून आरोपी हे टोळीचे सदस्य असल्याचे व ते कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात अनेक ठिकाणी खुणाचा प्रयत्न, अश्लील शिवीगाळ करणे, मारहाण करणे, अवैद्य हत्यार बाळगणे असे मालमत्तेविरूध्द व शरीराविरूध्द अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरीकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा—१९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.

गुन्ह्यातील आरोपींपैकी **राजा खान गफ्फार खान, वय ३२ वर्षे, रा. गोवा कॉलोनी, संतोषी माता मंदीर जवळ, सदर, नागपुर** हा गुन्हा घडल्यापासून स्वत:चे अस्तीत्व लपवुन मिळुन येत नव्हता. आरोपीचे शोधार्थ त्याचा पाठपुरावा करीत असता, सदर पोलीसांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, दिनांक ०९.१०.२०२६ रोजी त्यास ताब्यात घेतले. आरोपीस वर नमुद गुन्हा व म.को.का. गुन्हेसंबंधाने अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. श्री. शिवाजी गायकवाड, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर, सपोनि. नरेंद्र तायडे, पोउपनि. जगन्नाथ शेरकर, पोहवा. प्रकाश बाळबुधे, सतीष गोहत्रे, निलेश लोंदे, अमीत चेके, प्रेम ढोके, पोअं. अश्वीन भांगे व प्रशांत गायधने यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे बजाजनगर :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत प्लॉट नं. ७, लक्ष्मी नगर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती रश्मी राजु पांडे, वय ७२ वर्षे ह्या आपले राहते घरी हजर असतांना, दिनांक ०५.१०.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, त्यांचे मोबाईलवर व्हीडीओ कॉल आला. त्यांनी कॉल घेतला असता, कॉलर याने तो लखनौ येथे ए.टी.एस चा अधिकारी विवेक शर्मा असल्याची बतावणी करून, 'तुमचे बॅकेचे खात्यात टेररीस्ट फंडींगची रक्कम जमा झाल्याचे व व्यवहार झाल्याचे सांगुन', त्यांना भिती दाखवुन, धमकी दिली. तसेच, अटक वाचविण्यासाठी पैशाची मागणी करून दिनांक ०५.१०.२०२६ ते दि. ०७.१०.२०२६ चे १०.२० वा. चे दरम्यान, फिर्यादीकडून एकूण ८,००,१००/— रू. स्वत:चे खात्यात घेवुन, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे पोहवा. अन्सारी ९८२३४६४६३१ यांनी आरोपीविरूध्द कलम ३०८,३१८(४),३१९(२) भा.न्या.सं., सहकलम ६६(ड) आय.टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**<u>पोलीस ठाणे सदर :—</u>** मुलगी नामे वैष्णवी सुरेश कंगाले, वय १९ वर्षे, रा. बेला बोरगांव, तह. उमरेड, जि. नागपुर हीला दिनांक ०१.१०.२०२६ रोजी सखी वनस्टॉप सेंटर, वर्धा यांचे मार्फतीने शासकीस सरस्वती महीला वसतीगृह, जुना काटोल नाका चौक, नागपुर येथे दाखल करण्यात आले होते. दिनांक ०२.१०.२०२६ चे २२.३० वा. नंतर तीने कक्षाचे गच्चीवरून सुरक्षा भिंतीवरून उडी मारून, भिंत ओलांडुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. तीचा शोध घेतला मिळुन आली नाही. बेपत्ता आहे. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, केस—काळे लांब, उंची—४ फुट ५ इंच, डोळे—काळे, अंगात—फिक्कट पिस्ता रंगाचा कुर्ता व काळी जीन्सपॅन्ट घातलेली आहे. भाषा—मराठी, हिंदी बोलते. कोणीतरी अज्ञात ईसमाने तीला फुस लावुन पळवुन नेले असावे. अशा संशयावरून पोलीस ठाणे सदर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



वैष्णवी

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १८ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३००३०६/ २००८ | कलम ४५२, ५०४, ५०६ (ब), ३२३, ३४ भा.दं.वि. | विकास ज्ञानेश्वरसिंह सिंग, रा. खामला, मिलींद नगर, पि.नं. २१, राणाप्रतापनगर, नागपुर. | १२.१०.२०२६ |
| २ | मा. १२ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०१२७८/ २००९ | कलम ३८० भा.ह.का. | संतोष सुरेश नेवारे राजपुत, रा. ह.मु– आनंद मेश्राम जोशी वाडी, जिआरपि हेड क्वॉर्टर ग्राऊंड जवळ, नागपुर. | १२.१०.२०२६ |

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट

वाहतूक परिमंडळ लकडगंज अंतर्गत, MRIDC तर्फे आजमशाह चौक ते मारवाडी चौक येथे उड्डाणपुलाचे लॉचिग चे काम ३० दिवसात रात्रीच्या वेळी करण्यात येणार आहे. करीता नमुद कामाकरीता वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता मारवाडी चौकाकडुन आजमशाह चौकाकडे जाणारी वाहतूक वळविणे गरजेचे आहे. त्यावर प्रतिबंध व्हावा, करीता या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन वाहतुक वळविण्याबाबत खालीलप्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**मारवाडी चौकाकडुन आजमशाह चौक कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- मारवाडी चौकातुन आजमशाह चौकाकडे जाणारी वाहतूक ही जुने मोटार स्टॅंड चौकाकडुन डावे वळण घेवुन सुनिल हॉटेल नंतर उजवे वळण घेवुन टेलिफोन एक्सचेंज चौक मार्गे जातील.
- आजमशाह चौकाकडुन मारवाडी चौकाकडे जाणारी एकतर्फी वाहतूक सुरू राहील.

**सदर अधिसूचना दिनांक ११.१०.२०२६ ते १०.११.२०२६ पर्यंत दररोज रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० वा. पावेतो अंमलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी वरील कार्यक्रमाचे वेळेनुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/–**
**(आदित्य मिरखेलकर, भापोसे)**
पोलीस उप आयुक्त,वाहतुक,
नागपूर शहर.